कोकण विकास कार्यक्रम- मत्स्यबंदराचा व
मत्सयव्यवसायाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.मत्स्यवि-१०००/(१३८)/पदुम-१४,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांकः-१३ नोव्हेंबर,१९९५.

प्रस्तावनाः-

राज्यातील सागरी जिल्यात एकूण १८४ मासळी उतरविण्याची केंद्रे आहेत, मात्र त्या ठिकाणी मासळी उतरविणे, सुकविणे व विक्री यासाठी मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अशा स्थितीत या केंद्रावर आवश्यक जेटी उभारणे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्यास सागरी मत्स्योत्पादनात निश्चित वाढ होईल. त्याअनुषंगाने कोकण विकास कार्यक्रमांतर्गत मत्स्यव्यवसाय विकासासाठी सागरी जिल्हयातील मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा व बळकटीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णयः-

वरील पाश्वभूमीवर मत्स्यबंदराच्या व व्यवसायाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय रत्नागिरी येथे दि.१७/५/२००० रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सागरी जिल्हयात मूलभूत सुविधांची निकड लक्षात घेता, विहीत कालावधीत सदर निर्णयांची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामध्ये खालील महत्वाच्या बाबींचा समावेश आहे.

१) कोकण विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षी रुपये ५ कोटी प्रमाणे चार वर्ष अतिरिक्त निधी मत्स्यव्यवसायासाठी देण्यात येईल.
२) जेटटी व बंदरांच्या विकासासाठी व तेथे मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ या तीन वर्षामध्ये एकूण रु.२५० कोटीची तरतूद उपलब्ध करुन देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. हा निधी शासनाच्या क्रमांक १ वरील सहभागाव्यतिरिक्त व शासनाच्या नेहमीच्या अर्थसंकल्पीय तरतूदीव्यतिरिक्त नाबार्ड, एनसीडीसी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ व एमपीइडीए इत्यादींकडून कर्जरुपाने घेण्यात

यावा. त्यात खालील कामांचा समावेश करुन सविस्तर प्रस्ताव तयार करुन वित्त/नियोजन विभागाची सहमती घेऊन मा.मुख्यमंत्र्याच्या मान्यता प्राप्त करुन घेवून राबविण्यात यावा.

अ) सध्या प्रगतीपथावर असलेल्या सहा बंदरांची व सहा जेट्टीची कामे पूर्ण करणे

ब) नवीन सात बंदरे व १९ जेट्टीची काम हाती घेऊन पूर्ण करणे

क) पणन सुविधांची स्थापना व बळकटीकरण करणे,

३) प्रत्येक सागरी जिल्हयात २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ या तीन वर्षी ५० यांत्रिकी नौका एनसीडीसी कडून कर्जाच्या सहाय्याने देण्यात याव्यात. त्याचबरोबर प्रत्येक सागरी जिल्हयात ५० यांत्रिकी नौकांवर (एकूण २५०) अत्याधुनिक उपकरणे (नेविगेटर, फिश फाईंडर, रेडियो, टेलिफोन) यासाठी शासन निर्णय क्र.मत्स्यवि-१०९६/१४४३२/(४९१)/पदुम-१४,दिनांक १२ ऑक्टोबर,१९९९ यानुसार मान्य, प्रचलित योजनेद्वारे मच्छिमारांना पुरविण्यात यावी.

४) महाराष्ट्र शासन व एम.पी.इ.डी.ए. सहभागाने होल्डींग कंपनी स्थापन करुन त्या माध्यमातून उरण येथे सीफूड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी स्थापन करण्याचा तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.

५) प्रत्येक सागरी जिल्हयात मच्छिमार संस्थेला रिमोट सेन्सींग एजन्सी कडून प्राप्त होणारी माहिती ताबडतोब पाठविणे शक्य होण्यासाठी व मच्छिमारीला भरीव मदत होण्यासाठी जिल्हा कार्यालयांना फॅक्स मशीन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२. मंत्रिमंडळ बैठकीतील, वरील अनुक्रमांक (२) व (३) वरील निर्णयांच्या तात्काळ अंमलबजावणी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) कोकण विकास कार्यक्रमातंर्गत प्रगतीपथावर असलेल्या बंदर व जेटटींच्या कामाव्यतिरिक्त,निवड करण्यात आलेल्या प्रस्तावित नवीन ७ बंदरे व १९ जेट्टींची यादी सोबतच्या परिशिष्ट अ येथे जोडण्यात आली आहे. सदरच्या यादीप्रमाणे निवड करण्यात आलेल्या नवीन बंदरे व जेट्टींची अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन नाबार्डच्या विचारार्थ सादर करावयाचा प्रारुप प्रकल्प अहवाल दिनांक ३० जुलै,२००० पर्यंत सादर करण्यात यावा.

ब) त्याचप्रमाणे, पणन सुविधांतर्गत मार्केट यार्ड, बर्फ कारखाना, शीतगृह या सोयी उपलब्ध करण्यासाठी १० जागांची निवड करुन, नाबार्डकडे किंवा तत्सम प्राधीकरणाकडे पाठविण्यासाठी प्रकल्प अहवाल दिनांक ३० जुलै,२००० पर्यंत सादर करण्यात यावा. आर्थिक दृष्टया प्रगत व प्रबल मच्छिमार सहकारी संस्थांना या कार्यक्रमांत आर्थिक सहभाग घेण्यासाठी प्रवृत्त करण्यात यावे.

क) प्रारुप प्रकल्प अहवाल मंजूरीसाठी सादर करतांना, त्यामध्ये वर्षनिहाय कामाचे टप्पे निश्चित असावेत. त्यानुसार सन २०००-०१ या चालू आर्थिक वर्षात दर्शविण्यात आलेली कामे विहीत कालावधीत पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी.

ड) सदर जेट्टी, बंदर व पणन सुविधा पूर्ण झाल्यावर व्यवस्थापनासाठी सहकारी संस्थेकडे जेथे शक्य आहे तेथे हस्तांतर करणे व सदर संस्थेने शासन मान्य दराने शुल्क वसूल करणे अभिप्रेत आहे.

इ) १) यांत्रिक नौका (२५०) व यांत्रिक नौकेवरील अत्याधुनिक उपकरणे (२५० या योजनेखाली लाभार्थींची निवड एक महिन्याच्या आत करण्यात यावी. यांत्रिकी नौकांसाठी निवड झालेल्या लाभार्थींची प्रकरणे तयार करुन ३० ऑगस्ट पर्यंत राष्ट्रीय सहकार विकास निगमकडे सादर करण्यात यावीत व कर्जमंजूरीसाठी पाठपुरावा करण्यात यावा.

२) आधुनिक उपकरणे नौकांमध्ये बसविण्यासाठी इच्छुक असलेल्या लाभार्थींना उपकरणाचा प्रकार, किंमत इत्यादी बाबत माहिती देण्यात यावी व त्यांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे संच निश्चित करण्यात यावेत. मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण शाळेतून प्रशिक्षणाच्या माध्यमातून व मच्छिमारांचा मेळावा/बैठकीतून आधुनिक यंत्रसामुग्रीचा फायदा घेण्याबाबत मच्छिमारांना प्रवृत्त करण्यात यावे. निवडलेल्या लाभार्थींची प्रकरणे तयार करुन ३१ डिसेंबर, २००० पर्यंत उपकरणांचा पुरवठा व अनुदानाचे वाटप होईल याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सी.के.जाधव)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट राज्य, मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन पदुम-१२/पदुम-१३/पदुम-१६ कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
उपसचिव (मत्स्यव्यवसाय), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई